# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१) १४०९९ (२७-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यात दोन वर्षात २० शेतकऱ्यांनी गळफास घेऊन, ७ शेतकऱ्यांनी विषारी औषध प्राशन करुन व दोन शेतकऱ्यांनी नदी, विहीरमध्ये उडी मारुन, अशा एकूण २९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून त्यापैकी शासनाने २१ शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यात दोन वेगवेगळया ठिकाणी नापिकी व बँकेच्या कर्जास कंटाळून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून, नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील दर्या उमरी येथील रहिवासी शेतकरी केशवराज पुंजाजी हंबर्डे व रामचंद्र संभाजी जुने ही दोन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नांवे असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासनाकडून मदत न मिळाल्यामुळे कुटुंबे कर्जबाजारी होत असून याची दखल शासन तातडीने घेणार आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्ह्यात माहे जानेवारी ते मे, २०२२ या कालावधीत ५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून जिल्हा प्रशासनाने केवळ एका शेतकऱ्याची आत्महत्या पात्र ठरविली असून उर्वरित ५१ प्रकरणे प्रलंबित ठेवली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन व निर्णय घेऊन आर्थिक मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आलेल्या शेतकरी आत्महत्या पात्र ठरवून त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मयत शेतकरी केशव पुंजाजी हंबर्डे, रा. उमरी, ता.हदगांव यांनी दिनांक ०१/०६/२०२२ रोजी तलावात उडी मारून आत्महत्या केल्याबाबत तहसिलदार,

हदगांव यांनी दिनांक ०५/०७/२०२२ रोजी प्राथमिक अहवालात नमूद केले आहे. तसेच रामचंद्र संभाजी जुने, रा. बेराळी, ता.मुखेड यांनी दिनांक २५/०५/२०२२ रोजी विष प्राशन करून आत्महत्या केल्याबाबत तहसिलदार, कंधार यांनी दिनांक २६/०५/२०२२ रोजी प्राथमिक अहवालाद्वारे कळविले आहे. दोन्ही प्रकरणी तालुकास्तरीय समिती व इतर अनुषंगिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत सदर प्रकरणे ठेऊन निर्णय घेण्यात येईल.

(३) अंशत: खरे आहे. वर्धा जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी, २०२२ ते २५ मे, २०२२ पर्यंत एकूण ७३ शेतकरी आत्महत्या प्रकरणे दिनांक २६ मे, २०२२ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या सभेत घेण्यात आली. शासन निर्णय दिनांक २३/०१/२००६ मधील निकषांनुसार एकूण ७३ प्रकरणांपैकी १५ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत पात्र ठरविण्यात आली असून १९ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. १ प्रकरण फेरचौकशीकरिता व ३८ प्रकरणे पोलीस विभाग व तालुकास्तरीय समितीचा अहवाल जिल्हास्तरीय समितीला अद्याप प्राप्त झालेला नसल्याने प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटंबियांना दिनांक २३/०१/२००६ च्या शासन निर्णयानुसार रुपये १ लक्ष मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३/०१/२००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष इतकी मदत देय आहे. उर्वरित प्रकरणी मदत अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरगांव (ता.लोहा, जि.नांदेड) येथील निराधारांना मानधन देण्याबाबत

**(२) १४१०२ (२७-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव (ता.लोहा, जि.नांदेड) येथील ६० ते ७० संजय गांधी निराधार व श्रावणबाळ या योजनेतील लाभार्थ्यांचे गत दिड वर्षापासून मानधन बंद केल्यामुळे सदर लाभार्थ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निराधारांनी दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागण्या पूर्ण होण्यासाठी तहसिल कार्यालयावर आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निराधारांना त्यांचे मानधन तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०७-२०२२) :** (१), (२) व (३) बोरगांव, ता.लोहा, जि.नांदेड येथील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी अपात्र असल्याबाबतची तक्रार दिनांक ११/०२/२०२१ रोजी प्राप्त झाल्याने पात्र ११० लाभार्थ्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीत ३७ लाभार्थी अपात्र करण्यात आले आहे. तर ३९ लाभार्थ्यांना माहे मार्च, २०२१ पासून नियमित अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित ३४ लाभार्थ्यांची फेरसखोल चौकशी करणे आवश्यक असल्याने त्यांचे अर्थसहाय्य थांबविण्यात आले. ३४ लाभार्थ्यांची फेरचौकशी एप्रिल, २०२२ मध्ये पूर्ण झाली असून सदर लाभार्थी चौकशीमध्ये पात्र ठरल्याने त्यांना मार्च, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीतील अर्थसहाय्याचे वितरण माहे जून, २०२२ मध्ये करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कृषी मालासाठी गोदामे उभारण्याबाबत

**(३) १४१४८ (२७-०६-२०२२) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अतिवृष्टीमुळे व अन्य कारणांमुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाचे प्रतिवर्षी नुकसान होत असल्याने राज्यातील प्रत्येक गावामध्ये कृषी मालासाठी गोदामे उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात शेतमालाचे उत्पादन वाढण्याची शक्यता असली तरी त्यांच्या साठवणुकीसाठी गोदामे पुरेशी नसल्यामुळे अनुदान तत्वावर प्रत्येक गावांमध्ये कृषी गोदामे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) व (२) शेतकरी, व्यापारी, शासकीय संस्था, कंपन्या यांना मालसाठवणुकीची सुविधा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कार्यरत आहे. माल साठवणूकीची सुविधा देण्यानुषंगाने स्वत:च्या मालकीच्या जागेवर व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये मोठ्या क्षमतेच्या गोदामांची उभारणी सदर महामंडळाकडून स्वनिधीतून केली जाते. शेतमालाच्या साठवणुकीसाठी अनुदान तत्वावर प्रत्येक गावांमध्ये कृषी गोदामे उभारण्याची बाब पणन विभागाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईला वीज पुरवठा करणारी यंत्रणा सक्षम करुन अतिरिक्त यंत्रणा उभारण्याबाबत

**(४) १४१६९ (२७-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०४२१ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या वाहिन्यांवर दाब येवून वीजप्रवाह खंडित झाल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत वीज आणणाऱ्या यंत्रणांवर कमालीचा भार असल्याने गत दीड वर्षात अशा प्रकारच्या घटनेची तीन वेळा पुनरावृत्ती झाली असून अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० अन्वये समिती गठीत करण्यात आली असून अनुषंगाने अशा घटना पुन: घडू नयेत याबाबत समितीच्या शिफारशींच्या अमंलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल व त्यातील शिफारशी व त्या शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल (Action Taken Report) याबाबतचे सादरीकरण दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर करण्यात आले असून याबाबत नोंद घेऊन शासनाने मुंबईत वीज आणणारी यंत्रणा सक्षम करुन अतिरिक्त यंत्रणा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०२२) :** (१) दिनांक २६/०४/२०२२ रोजी ४०० के.व्ही. पडघे उपकेंद्रात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे मुंबई महानगर, नवी मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील काही भागात विद्युत पुरवठा काही कालावधीसाठी खंडीत झाला होता.खंडीत झालेल्या भागातील वीज पुरवठा टप्याटप्याने सुरळीत करण्यात आला होता.
(२) व (३) महापारेषण विद्युत प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे दिनांक १२/१०/२०२० रोजी मुंबई व उपनगर तसेच मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे, मुंबई आदी भागात विद्युत पुरवठा खंडीत झाला होता.या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२० अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन राज्य पारेषण उपक्रमातर्फे खालील प्रकल्प प्रस्तावित केले आहेत.

अ) ४०० के.व्ही. बेळगाव उपकेंद्र प्रकल्पाला महापारेषण मंडळाची मंजूरी मिळाली असून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मंजूरीची प्रक्रिया सुरु असून उपकेंद्राच्या जागेसाठी पडताळणी सुरु आहे. सदर प्रकल्प सन २०२४-२५ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे.

ब) ४०० के.व्ही. कळवा-II उपकेंद्र प्रकल्पाला महापारेषण मंडळाची मंजूरी मिळाली असून तांत्रिक पडताळणी व अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्प सन २०२३-२४ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे.

क) ४०० के.व्ही. खारघर-विक्रोळी प्रकल्पाचे काम मे. के.व्ही.टी.एल. (अदानी) मार्फत प्रगतीपथावर असून जुलै-२०२३ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे.

ड) ४०० के.व्ही. कळवा-पडघे वाहिनी १ व २ या वाहिनी याचे एच.टी.एल.एस. (High Temprature Low Sag) कंडक्टर मध्ये रुपांतर करणे मार्च-२०२३ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे.

इ) HVDS कुडूस-आरे या अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लि. या प्रकल्पास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पारेषण परवाना दिला असून सन २०२४-२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण होणे नियोजित आहे.

ई) ४०० के.व्ही. पडघा (पॉवरग्रीड) ते नवी मुंबई व्दिदल वाहिनी मे. स्टरलाइट कंपनीकडून (टी.बी.सी.बी.) माध्यमातून डिसेंबर-२०२३ पर्यंत उभारणे नियोजित आहे.

उ) मुंबई क्षेत्रातील २२० के.व्ही. पारेषण वाहिनींची एच.टी.एल.एस. (High Temprature Low Sag) मध्ये रुपांतर करुन क्षमतावाढ करण्याचे नियोजित आहे.

महावितरण कंपनीने लेखापरिक्षण समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, मुंबई प्रदेशाच्या प्रतिबंधात्मक नियंत्रणासाठी टाटा पॉवर, अदानी इलेक्ट्रिसिटी, बेस्ट यांना विशेषत: दैनंदिन

जनरेशन शेडयूलिंग आणि एसएलडीसी नियंत्रण कक्षाशी समन्वय राखणासाठी राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा येथे त्यांचे अधिकारी/ प्रतिनिधी नियुक्त करण्यास सांगण्यात आले होते. त्याचप्रमाणे, महावितरणच्या अखत्यारीतील क्षेत्रावरील प्रतिबंधात्मक नियंत्रणासाठी दैनंदिन जनरेशन शेडयूलिंग पाहण्यासाठी एसएलडीसी नियंत्रण कक्षाच्या समन्वयाने कार्य करण्यासाठी एसएलडीसी कळवा येथे महावितरण कंपनीचा "भार व्यवस्थापन नियंत्रण कक्ष " कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील केंद्रीय निवासी / अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(५) १४२१२ (२७-०६-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक ११९२२ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहू, फुले, आंबेडकर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांचे अहवाल शासनास प्राप्त झालेले असून ३ आश्रमशाळा बंद आढळून आल्याने त्यांचे तपासणी अहवाल शासनास प्राप्त झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील २८८ केंद्रिय अनिवासी आश्रमशाळांना शासनाने सन २०१९-२०२० पासून २०% अनुदान तसेच सन २०२०-२०२१ पासून ४०% अनुदान मंजूर करुन व आर्थिक तरतूद करुन शिक्षक / कर्मचारी यांचे नियमित वेतन सुरु करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी शाळा योजनेंतर्गत एकूण १६५ आश्रमशाळांना तपासणीच्या अधीन राहून अनुदान देण्याबाबतचे धोरण वित्त विभागाच्या सहमतीने अंतिम करून अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार तपासणीअंती पात्र ठरलेल्या सर्व आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) होय.
शाहू, फुले, आंबेडकर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांचे अहवाल शासनास प्राप्त झालेले असून ३ आश्रमशाळा बंद आढळून आल्याने त्यांचे तपासणी अहवाल शासनास प्राप्त झालेले नाहीत.
(२) व (३) होय.
(४) नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध ठिकाणी पडलेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(६) १४२४८ (२७-०६-२०२२) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध ठिकाणी माहे एप्रिल, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे हजारो हेक्टरवरील शेती, फुले व फळपिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर व्हावी, यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

कोकण, पुणे व नाशिक विभागांमध्ये माहे एप्रिल, २०२२ या कालावधीत अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून एप्रिल, २०२२ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. विभागीय आयुक्त, कोकण व पुणे यांच्याकडून याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर एकत्रित प्रस्ताव राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी ठेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बीड, मराठवाडा या जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी अतिरिक्त ऊसाला भाव मिळत नसल्यामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(७) १४२५० (२७-०६-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.सुरेश धस, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.रामराव पाटील, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मराठवाड्यात ऊसाचे अतिरिक्त उत्पादन झाल्यामुळे ऊस तोड होत नसून तसेच ऊसतोड करणारी टोळी एकरी बारा ते पंधरा हजार रुपये शेतकऱ्यांकडून घेत असल्याचे अनेक ठिकाणी निदर्शनास आले असून ऊस कारखाने गटातील ऊस न काढता गटाबाहेरील ऊस काढत असून साखर कारखाना परजिल्ह्यातील ऊस आयात करत असल्याने नैराश्य येवून हिंगणगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील श्री.नामदेव आसाराम जाधव, श्री.शिवाजी बोंडे तसेच अकोला जिल्ह्यातील श्री.प्रविण कचरु आहेर या सारख्या अनेक शेतकऱ्यांनी नैराश्यात ऊस पेटवून शेतात आत्महत्या केल्याचे दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करुन २६५ जातीचा ऊसाची लागवड केली असून ऊस तोडणीला येऊनही एकही साखर कारखाना ऊस घेऊन जात नसल्याने कारखान्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने नैराश्यात शेतकरी आत्महत्या करीत असून शासनाच्या उदासीन धोरणामुळेच ऊस उत्पादकांवर शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे वक्तव्य शेतकरी नेते व संघटनेने केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मजूर, हार्वेस्टरची कमतरता व मजूर हार्वेस्टरचे मालक ऊसतोडणीसाठी जादा दर मागत असून जवळपास ३० ते ४० हजार मेट्रिक टन ऊस बीड जिल्ह्यात शिल्लक असून राज्यात अद्यापही ७० ते ८० लाख मेट्रीक टन ऊस हजारो हेक्टर क्षेत्रावर तोडणीविना उभा असल्याने शेतकऱ्यांचा मनात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२२-२०२३ या कालावधीतील गळीत हंगामात शेतकऱ्यांना गाळपासाठी समस्या उद्भवू नयेत याकरिता शासनाने जिल्हानिहाय कोणते नियोजन केले आहे, तसेच लातूर, उस्मानाबाद, बीड व संपूर्ण मराठवाड्यात ९० लाख टन ऊस हा शेतात उभा असून विभागातील ५८ साखर कारखानदारांना गाळप क्षमता वाढविण्याचे शासनाने व प्रशासनाचे आदेश देऊन सुद्धा अद्याप याबाबत शेतकऱ्यांच्या हितार्थ कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ऊस उत्पादक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत देऊन राज्यातील शेतातील ऊस संपेपर्यंत कारखाने सुरू ठेवण्यासाठी व उसाला योग्य मोबदला मिळून उस वाहतूक, ऊस गाळपासाठी अनुदान, साखर उतारा इत्यादी समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-०८-२०२२) :** (१) हिंगणगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकरी श्री.नामदेव आसाराम जाधव यांनी दिनांक ११/०५/२०२२ रोजी आत्महत्या केल्याचे दिसून येते.

श्री.प्रविण कचरु आहेर, रा. गणोरे, ता.अकोले, जि.अहमदनगर यांनी आत्महत्या केलेली नाही.

श्री.शिवाजी बोंडे यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.
(३) गाळप हंगाम २०२१-२२ हा दिनांक २१/०६/२०२२ रोजी बंद झाला असून कारखान्यांनी कार्यक्षेत्रातील गाळपास पात्र असलेल्या ऊसाचे गाळप पूर्ण केले आहे. गाळपाविना ऊस शिल्लक राहिलेला नाही.
(४) व (५) शेतकऱ्यांचे ऊसाचे वेळेत गाळप व्हावे यासाठी कारखान्यांच्या विनंतीनुसार ४४ साखर कारखान्यांची दैनदिन गाळप क्षमता १.५० लाख टनाने वाढविण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी २२ साखर कारखान्यांची ५५९२० टन प्रतिदिन गाळप क्षमतेमध्ये वाढ झालेली आहे. गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये प्रतिदिन गाळप क्षमता २५००० टन प्रतिदिन प्रमाणे वाढणार आहे उर्वरित गाळप क्षमता वाढ गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये होईल. गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये गाळपा विना ऊस शिल्लक राहिलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्यातील ग्रामपंचायतींवर ग्राम विद्युत व्यवस्थापक म्हणून निवड झालेल्याना प्रशिक्षण देवून नियुक्त्या करण्याबाबत

**(८) १४२५३ (२७-०६-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींवर शासन निर्णय क्र.पी.पी.एस. २०१६/प्र.क्र.८/प.रा.नुसार ग्राम विद्युत व्यवस्थापक म्हणून निवड केलेल्या ९१२ ग्रामपंचायतींपैकी ६३० ग्रामपंचायतींनी ग्रामविद्युत व्यवस्थापकांची नियुक्ती केली असून महावितरण, बीड यांनी सदर उमेदवारांना कुठलेही प्रशिक्षण किंवा नियुक्ती अद्यापर्यंत दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे पात्र उमेदवारांची यादी पाठविलेली असून अद्याप त्यावर कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती व लातूर या पाच जिल्ह्यांतील ग्राम विद्युत व्यवस्थापक यांच्या नियुक्त्या प्रशिक्षण देवून करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील पात्र ग्रामविद्युत व्यवस्थापकांना तात्काळ प्रशिक्षण देवून नियुक्ती करण्याबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास संघटनेने शासनाकडे निवेदनपर पत्र दिले असून त्यानुषंगाने शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक २०/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार महावितरण कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांकरिता ग्रामपंचायतींनी फ्रॅन्चायझी म्हणून काम करणेबाबत व्यवस्थापकांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. यात अधीक्षक अभियंता, बीड यांचे दिनांक ३०/०६/२०२२ चे पत्रानुसार एकूण ९१२ ग्रामपंचायतीपैकी ६२३ ग्राम पंचायतीने ग्राम विद्युत व्यवस्थापकांची निवड केली आहे. महावितरण कंपनीतर्फे कागदपत्रे पडताळणी केल्यानंतर २०० उमेदवार पात्र झाले आहेत. परंतु कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून प्रशिक्षणाकरीता निधी अप्राप्त असल्याने सदर पात्र उमेदवारांना प्रशिक्षण देण्याअभावी नियुक्ती प्रलंबित आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

अधीक्षक अभियंता, बीड यांचे दिनांक १३/०९/२०१९ च्या ई-मेल नुसार एकूण २०० पात्र उमेदवारांची यादी महावितरणकडे प्राप्त झाली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) ग्राम विद्युत व्यवस्थापकांच्या प्रशिक्षणासाठीची मंजुरी व निधी उपलब्ध होण्याकरीता महावितरण कंपनीमार्फत कौशल्य विकास विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(५) ग्राम विद्युत व्यवस्थापकांच्या प्रशिक्षणासाठीची मंजुरी व निधी अद्यापर्यंत अप्राप्त असल्याने सदर कार्यवाही प्रलंबित आहे.

---

## राज्यातील विविध जिल्ह्यातील पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(९) १४२८६ (२७-०६-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम सन २०२२ करीता रुपये १६३८ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट शासनाच्यावतीने बँकास देण्यात आले असून गत पाच वर्षात सदर जिल्ह्यातील विविध बँकानी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न केल्याचे निदर्शनास आले असून याकरिता जिल्हा प्रशासन परभणी यांच्या स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी जिल्हा वार्षिक पतपुरवठा आराखड्यानुसार २ हजार ३२७ कोटी रुपयांच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून रब्बी हंगामात माहे मार्च, २०२२ अखेरपर्यंत बँकांनी १ हजार ६३४ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले असून उर्वरित पीक कर्ज वाटप न झाल्याने सावकारी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सुमारे ६७ लाख शेतकऱ्यांना सन २०२१-२२ मधील रब्बी व खरीप हंगामात २० हजार ५८४ कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकर्स कमिटीने दिले असून दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारापर्यंत राज्यातील ३१ जिल्हा बँकांनी १६ हजार ९४२ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले असून ७ लाख शेतकऱ्यांना विशेषत: कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना बँकाकडून पीककर्ज मिळू शकलेले नाही ही माहिती राज्य बँकेकडून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोहारा (ता.सालेकसा, जि.गोंदिया) व देवरी तालुक्यातील शेतकऱ्यांना जिल्हा बँकेकडून ५ मे, २०२२ पूर्वी पीक कर्ज वाटप करण्यात येते, तथापि, जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप न झाल्यामुळे सालेकसा व देवरी तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पीक कर्ज उपलब्ध न झाल्यास बी-बियाणे, खते यांच्या किंमतीत वाढ होऊन शेतकऱ्यांना आर्थिक भार सोसावा लागणार असून शेतकऱ्यांना शेतपीकाच्या हंगामात पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे माहे मे, २०२२ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असून तालुका व बँक निहाय पीक कर्ज वाटपाबाबतचे नियोजन काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कर्ज वाटपाचे उद्दीष्ट अपूर्ण ठेवण्यासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन प्रतिवर्षी कर्जवाटपाचे उद्दीष्ट पूर्ण व्हावे यादृष्टीने शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-०८-२०२२) :** (१) परभणी जिल्ह्यासाठी राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सन २०२२-२३ साठी रुपये १७९३ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप लक्षांक देण्यात आला आहे. त्यानुसार माहे जून, २०२२ अखेर जिल्ह्यातील ०.६३ लाख शेतकऱ्यांना रुपये ४२१ कोटीचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे व त्याची पुर्तता ३६% आहे. सन २०२२-२३ मधील पीक कर्ज वाटपासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत पीक कर्ज वाटपाचा लक्षांक सर्व बँकांना देण्यात आला

आहे. सदर समितीच्या सभेमधुन सर्व बँकांना पीक कर्ज वाटपाबाबत सुचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागणीप्रमाणे कर्ज वाटप होत असल्याची खातरजमा करण्यासाठी त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या सोईसाठी ऑनलाईन पीक कर्ज मागणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) अंशतः खरे आहे.

तथापि, राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या दिनांक ०८/०३/२०२२ च्या अहवालानूसार कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या ३१.७३ लाख शेतकऱ्यांपैकी २०.९६ लाख शेतकऱ्यांना रुपये १४,९२७ कोटींचे पीककर्ज वाटप केले आहे.
(४) नाही.
(५) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये त्याचप्रमाणे राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये पीक कर्ज वाटप लक्षांक व शेतकऱ्यांना विहित मुदतीत व मागणीप्रमाणे पीक कर्ज पुरवठा याबाबत सर्व बँका व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत.
(६) राज्यस्तरीय बँकर्स समिती त्याचप्रमाणे शासन निर्णय दिनांक २७ जून, २०२२ अन्वये प्रत्येक तालुक्यामध्ये स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून सदर समितीमार्फत पीक कर्ज वाटप प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे. तसेच सहकार आयुक्तालयामार्फत वेळोवेळी पीक कर्ज वाटपाचा व त्यामधील प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.

---

## सोलापूर जिल्ह्यातील चारा छावण्यांच्या प्रलंबित असलेल्या देयकांबाबत

**(१०) १४२९६ (२७-०६-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७२८२ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात सन २०१९ मध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाने जनावरांची छावणी चालविण्यास अनेक संस्थांना परवानगी दिली होती त्यातील मंगळवेढा व सांगोलायेथील जनावरांच्या छावणी चालकांची सुमारे ३८ कोटी रुपयांची देयके शासनाकडे अद्यापही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जनावरांच्या छावण्या बंद होऊन अडीच वर्ष एवढा कालावधी झाल्यानंतरही छावणी चालकांना महसूल खात्याकडून दंडाच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये २९९ चारा छावण्यापैकी ६६ चारा छावण्यांची संपूर्ण देयके अदा केलेली असून उर्वरित २३३ चारा छावण्यांना अद्याप अनुदान प्राप्त झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून प्राप्त अनुदानापैकी सोलापूर जिल्ह्यातील छावण्यांच्या तपासणीमध्ये पशुसंख्येच्या तफावती व त्रुटी दुर करुन सदर चारा छावण्यांना अनुदान वितरीत करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंगळवेढा व सांगोला (ता.जि.सोलापूर) येथील जनावरांच्या छावण्याची प्रलंबित असलेली देयके तात्काळ अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यात सन २०१९ मध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाने जनावरांची छावणी चालविण्यास अनेक संस्थांना परवानगी दिली होती. त्याकरिता जिल्ह्यांच्या मागणीनुसार आवश्यक तो निधी शासनाने वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेला होता.तथापि, देयके संबंधितांकडून वेळेवर प्राप्त न होणे, जनावरांची ऑनलाईन नोंदणी नसणे अशा काही कारणांमुळे काही देयके क्षेत्रिय स्तरावर छाननीसाठी प्रलंबित होती.
(२) हे खरे नाही.

चारा छावण्या बंद झाल्यानंतर अडीच वर्षानंतर कोणत्याही छावणीस नोटीस देण्यात आलेली नाही. चारा छावणी सुरु असताना आकस्मिक तसेच नियमित तपासणीमध्ये आढळून आलेल्या पशुसंख्येच्या तफावतीबाबत संबंधित चारा छावण्यांना वेळोवेळी संबंधित तहसिलदार यांच्याकडून नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीशीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचे समक्ष तहसिल कार्यालय, सांगोला व मंगळवेढा येथे घेण्यात आलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, मंगळवेढा यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये दंडाचे आदेश पारीत केले आहेत.
(३) हे खरे नाही.

माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये जिल्ह्याच्या मागणीनुसार सर्व चारा छावण्यांसाठी शासनाने रुपये १८३.७७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पशुसंख्येच्या ऑनलाईन हजेरीनुसार, सर्व पात्र छावण्यांना रुपये १४६.८१ कोटी इतका निधी अदा करण्यात येऊन पशुसंख्येची ऑनलाईन हजेरी न लावल्यामुळे काही चारा छावण्यांना देयके अदा न करता उर्वरित रक्कम रुपये ३६.८६ कोटी इतका निधी समर्पित करण्यात आलेला आहे.
(४) व (५) सोलापूर जिल्ह्यातील चारा छावण्यांच्या प्रश्नांबाबत तत्कालीन मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०५/२०२२ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार, विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विमुक्त भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नॉन क्रिमीलेअर चा लाभ देण्याबाबत

**(११) १४३०९ (२७-०६-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक उपक्रम व तत्सम उपक्रमातील कर्मचारी सार्वजनिक उपक्रम बँका, विमा संस्था, विद्यापीठे इ. समकक्ष पदे धारण कर्मचाऱ्यांना नॉन क्रिमीलेअरचा लाभ देण्याची तरतूद असताना राज्यातील अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विमुक्त भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील अनेक शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी या शासन निर्णयाचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती व स्वरुप काय आहे ?

**श्री.अतुल सावे (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जय वकील स्कूल, शिवडी, मुंबई येथील श्रीमती कविता हरेश चिले यांना मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवासातत्य देण्याबाबत

**(१२) १४३१५ (२७-०६-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जय वकील स्कूल, शिवडी, मुंबई येथील श्रीमती कविता हरेश चिले या २० वर्षापासून कार्यरत असून त्यांना सेवासातत्य देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७ जून २०१८ रोजी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्याला रुपये २५०००/- दंड आकारावा असे आदेश आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, श्रीमती कविता चिले यांच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्यावर शासन काय कारवाई करणार आहे व अशा अन्य प्रकरणांमध्ये शासन काय कारवाई करणार आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मा.उच्च न्यायालय येथे दाखल असलेली रिट याचिका क्र.५०७/२०१४ यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०६/२०१८ रोजी श्रीम.चिले याचे दिनांक ०१/०८/२०१० ते दिनांक ३१/०५/२०१८ या कालावधीतील वेतनाच्या रकमेची परिगणना करुन वेतन अदा करणेबाबत आदेश पारित केले आहेत. सदरहू आदेशाच्या अनुषंगाने श्रीम.चिले यांना जिल्हा कार्यालयाने दिनांक ०१/०८/२०१० ते दिनांक ३१/०५/२०१८ या कालावधीचे दिनांक १५/०७/२०१८ पूर्वी वेतन अदा केलेले आहे.

---

## दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा, कर्म शाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१३) १४३१६ (२७-०६-२०२२) श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १३३२१ ला दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगांच्या अुनदानित विशेषशाळा, कर्मशाळा संबंधित कार्यरत वसतिगृह अधीक्षक, गृहपाल यांना सहाव्या वेतन आयोगामध्ये ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० वेतनश्रेणी अपेक्षित असताना त्यांना ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० वेतनश्रेणी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.अध्यक्ष, राज्य सुधारणा समिती वेतन आयोग (बक्षी समिती) समोर याबाबत सुनावणी झाली आहे,, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना अपेक्षित वेतनश्रेणी देण्याबाबत आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना ६ व्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२००, ग्रेड पे-१९०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

(२) मा.अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती (बक्षी समिती) यांच्याकडे दिनांक २५/०९/२०१८ ला बैठक झाली. वेतन त्रुटी उच्चस्तर समितीचा अहवाल खंड-२ दिनांक ०९/०२/२०२१ रोजी वित्त विभागास सादर करण्यात आला असून त्यावर मा.मंत्रीमंडळाचा निर्णय झाल्यानंतर तो शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, असे वित्त विभागाने कळविले आहे.

(३) मा.अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समितीच्या दिनांक २५/०९/२०१८ च्या बैठकीत उक्त विषय ठेवण्यात आला असून याबाबत समितीचा अहवाल खंड-२ हा अद्याप प्रसिध्द झालेला नाही. त्यामुळे आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा शासनास सादर केलेला अहवाल प्रतिक्षाधीन ठेवण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोना पिडीत कुटुंबियांना शासनाच्या वतीने सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(१४) १४३३० (२७-०६-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना पिडीत कुटुंबाना शासनाच्या आर्थिक लाभ योजनेंतर्गत ५० हजार रुपये मदत देण्याचा आदेश शासनाने दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कोरोनामुळे मृत्यू झालेल्या सुमारे दोन लाख ५२ हजार कुटुंबीयांनी ५० हजार रुपये भरपाई मिळण्यासाठी अर्ज केले असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून अनुदानाकरिता १६ हजार ८२४ लाभार्थ्यांपैकी १३ हजार लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर होवूनही अद्याप सदर लाभार्थी कूटूंबांना मदत मिळाली नसल्याचे दिनांक २० मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेसाठी सोलापूर जिल्यात ६ हजार १९८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ४ हजार १९३ अर्ज मंजूर झाले असून १५ दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा होणे अपेक्षित असताना त्यातील ३० टक्के लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले नसुन सुमारे ७० टक्के कुटुंबियांना अद्यापही भरपाईची रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उर्वरित मदतीसाठी आलेल्या अर्जांची तातडीने छाननी करून सदर लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

राज्यात जुलै, २०२२ पर्यंत कोव्हिड-१९ या आजाराने १,४८,०८८ इतक्या व्यक्तींचे निधन झाल्याची नोंद असून सुमारे २,५९,९९६ कुटुंबीयांनी ५० हजार रुपये सानुग्रह सहाय्य मिळण्यासाठी अर्ज सादर केले आहे. त्यापैकी ३४४०० अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. ५० हजार रुपये सानुग्रह सहाय्य मिळण्यासाठी अर्ज सादर केल्यापैकी १,९६,४४१ कुटुंबीयांना ५० हजार रुपये अदा करण्यात आले आहे. उर्वरित अर्ज विविध टप्प्यावर कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत.
(३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयामध्ये कोव्हिड-१९ या आजाराने निधन झालेल्या १२०४७ कुटुंबीयांनी ५० हजार रुपये सानुग्रह सहाय्य मिळण्यासाठी अर्ज सादर केले त्यापैकी ८१६८ कुटुंबीयांना ५० हजार रुपये अदा करण्यात आले आहे. उर्वरित अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर पदे निर्माण करुन दिव्यांगाच्या योजना राबविण्याबाबत

**(१५) १४३५१ (२७-०६-२०२२) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगासाठी जिल्हास्तरावर सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित वेगळा विभाग निर्माण करून महापोर्टल सेवा बंद करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली असून दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांगांच्या २०१६ मधील कायद्यांमध्ये २१ प्रकारच्या दिव्यांगांना सामावून घेण्यात येत असल्याने कामाची व्याप्ती वाढली असून नोकर भरतीसाठी महापोर्टल सेवेमध्ये पारदर्शकता नसल्याची तक्रार स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हास्तरावर समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांगांचा विभाग सुरू असल्याने अधिकाऱ्यांना काम करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिव्यांगांसाठी पुणे येथे ज्याप्रमाणे स्वतंत्र आयुक्तालय निर्माण केले आहे त्याच धर्तीवर जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी व तालुकास्तरावर तालुका दिव्यांग कल्याण अधिकारी ही पदे निर्माण करुन दिव्यांगाच्या योजना राबविण्याबाबत व स्वतंत्र विभाग निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३) हे खरे आहे.
(४) दिव्यांग बांधवासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यासाठी आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना आयुक्तालयास्तरावर समिती गठीत करुन त्या समितीने इतर राज्याने याबाबत कोणती कार्यवाही केली याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पडवे ठुकरूलवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील बंधाऱ्याची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१६) १४३८७ (२७-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पडवे ठुकरूलवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) खारभूमी विकास बंधाऱ्याची अत्यंत दुरावस्था झाली असून भरतीच्या वेळी समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीमध्ये शिरल्यामुळे गत ३ वर्षांपासून शेत जमीन पडीक असून शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाह तसेच विहिरीचे पाणीही दूषित झाल्यामुळे ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाल्याने सदरहू खारभूमी विकास बंधाऱ्याची विनाविलंब पुनर्बांधणी करून नवीन झडपा बसविण्यात याव्यात अशा आशयाच्या मागणीचे निवेदन ग्रामस्थांनी मा.खारभूमी विकास मंत्री, मा.पालक मंत्री रत्नागिरी, जिल्हा अधीक्षक अभियंता खारभूमी विकास योजना कोकण विभाग, कळवा जि.ठाणे आदींकडे गत २ वर्षांपासून सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने सदर नादुरुस्त खारभूमी विकास बंधाऱ्यांशी संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतरही आजमितीस २ वर्षांचा कालावधी होवूनही उक्त बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) असे निवेदन अप्राप्त आहे.
(२) पडवे ठुकरुलवाडी या योजनेचा बांध सुस्थितीत आहे. या बांधाच्या नादुरुस्त झालेल्या उघाडीच्या झडपा बसविण्याचे काम मार्च, २०२२ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रापण क्षेत्र संरक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समाजकल्याण विभागाकडून प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या स्तरावर प्रलंबित असल्याबाबत

**(१७) १४४१७ (२८-०६-२०२२) डॉ.सुधीर तांबे, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात समाज कल्याण विभागाच्यावतीने अनु.जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातून ऑनलाईन महाडीबीटी पोर्टलव्दारे ६६ हजार तर पूणे विभागातून १२ हजार ७११ विद्यार्थ्यांचे अर्ज तसेच शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी ६६ हजार अर्ज अद्यापही विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रक्रियेमध्ये २४ हजार विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जच सादर केले नाहीत तर महाविद्यालय स्तरावर ४२ हजार अर्ज प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रलबित प्रकरणासंबधी महाविद्यालयाना समाजकल्याण विभागाकडून सुचना देवूनही कार्यवाही होत नसून या संदर्भात शासनाने चौकशी करुन महाविद्यालयाकडील सदरील प्रलंबित अर्ज ताडीने शासनास सादर करण्याच्यादृष्टीने प्रलंबित ठेवून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणाऱ्या महाविद्यालयावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

साधारणत: दिनांक २३ मे, २०२२ रोजी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे राज्यभरात विद्यार्थी स्तरावर एकूण २६००४ अर्ज व महाविद्यालय स्तरावर एकूण ३१०२९ अर्ज असे एकूण ५७०३३ अर्ज प्रलंबित होते.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मराठवाडा भागातील साखर कारखानदारांनी अनुदान व ऊस गाळपास प्रोत्साहन देण्याच्या केलेल्या मागणीबाबत

**(१८) १४४७९ (२७-०६-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा भागातील साखर कारखानदारांनी अतिरिक्त उसाचे उत्पादन झाल्यामुळे शासनाकडून भरीव अनुदान मिळण्याबाबत मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारापासून वाहतूक घट व साखर घट उतारा अनुदान देण्याबाबत मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक २८ एप्रिल २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाला बदलून सरसकट घट अनुदानाची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊस गाळप हंगाम शिल्लक राहिल्यास शासनावर मोठा आर्थिक भार पडणार असून त्यानुषंगाने शासनाने अनुदान व ऊस गाळपास प्रोत्साहन देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने साखर कारखानदारांची निकड लक्षात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१९-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये उसाचे विक्रमी उत्पादन झाले आहे. साखर कारखाने बंद झाल्यास शेतकऱ्यांचा ऊस गाळपाविना शिल्लक राहील आणि शिल्लक राहिलेल्या ऊसास नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवु शकेल ही बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांचा शिल्लक ऊस गाळप होण्यासाठी दिनांक ०१/०५/२०२२ नंतर गाळप होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उर्वरित सर्व ऊसाला ऊस गाळप अनुदान म्हणुन रुपये २०० प्रति टन प्रमाणे संबंधित साखर कारखान्यांना अनुदान देण्याचा तसेच साखर आयुक्तालयाने अनिवार्य वितरित केलेल्या ऊसासाठी ५० कि.मी. अंतर वगळुन वाहतूक खर्च प्रति टन प्रति कि.मी. रुपये ५ दराप्रमाणे ऊस वाहतूक अनुदान देण्याचा निर्णय शासनाने दिनांक २८/०४/२०२२ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोराडी (जि.नागपूर) येथील वीज केंद्रात फ्युल गॅस डीसल्फरायजेशन सिस्ट लावण्याबाबतची निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१९) १४५०९ (२७-०६-२०२२) श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १३१७२ ला दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी (जि.नागपूर) येथील वीज केंद्रात प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी फ्युल गॅस डीसल्फरायजेशन सिस्ट लावण्यात येण्याबाबतची निविदा प्रक्रिया गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारत सरकारच्या कंपनीला उक्त फ्युल गॅस डीसल्फरायजेशन सिस्टचे कंत्राट मिळाले असतानाही स्पर्धात्मक दर मिळविण्यासाठी खासगी कंपनीला लाभ घेता यावा याकरीता काही शासकीय अधिकारी उक्त निर्णय घेण्यास विलंब करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्रात संच क्र. ८, ९, १० साठी एफ.जी.डी. संयंत्र उभारणीकरीता दिनांक ४ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास नव्याने पात्रता निकष अंतर्भूत करुन नव्याने राबविण्यात आलेल्या एकत्रित निविदा प्रक्रियेबाबत शासनास तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याचे निवारण करण्याच्यादृष्टीने शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करुन कार्यादेश देवून कोराडी (जि.नागपूर) येथील वीज केंद्रात संयंत्र उभारणीचे काम तात्काळ सुरु करावे या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये महानिर्मिती कंपनीकडून अहवाल मागविण्यात आला होता.त्या अनुषंगाने, महानिर्मिती कंपनीने दिनांक १३/०७/२०२१ च्या पत्राव्दारे सदर अहवाल सादर केला. तदूनंतर शासनाने दिनांक १८/०८/२०२१ च्या पत्रान्वये, सदर तक्रारीबाबत मुद्येनिहाय परिपूर्ण अहवाल मागविला तसेच प्रस्तुत निविदा संदर्भात पुढील कोणतीही कार्यवाही करु नये असे निर्देश दिले. दिनांक १८/०८/२०२१ च्या पत्रान्वये मागविलेल्या मुद्येनिहाय माहितीच्या अनुषंगाने महानिर्मिती कंपनीकडून दिनांक २५/०८/२०२१ च्या पत्रान्वये अतिरिक्त माहिती संबंधित कागदपत्रांसहित शासनास सादर केली आहे. तसेच, दिनांक ३१/१२/२०२१ रोजी सदर निविदेबाबतची अद्ययावत/सुधारित माहिती शासनास सादर केली आहे. तद्नंतर दिनांक १२/०४/२०२२ रोजी प्रधान सचिव (व्यय), महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली निविदे प्रक्रियेतील दिनांक १८/०५/२०२१ रोजी झालेल्या उलटबोली प्रक्रियेसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.

शासनाकडून दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे सदर विषयाबाबतचे वित्त विभागाने उपस्थित केलेल्या निष्कर्ष/ शिफारशीच्या अनुषंगाने, निविदेच्या दिनांक १८/०५/२०२१ रोजीच्या Reverse Auction Bid प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या अंतिम बोलीस (Lowest Bid) बेस प्राइस धरुन, तृतीय पक्ष पोर्टलवर Reverse Auction Bid प्रक्रिया राबविणे कायदेशीरदृष्टया स्वीकारार्ह आहे किंवा कसे, याची तपासणी करुन, तसेच पुनर्निविदा काढण्याबाबतचे परिणाम (Implications) यांबाबत साधक-बाधक विचार करुन महानिर्मितीचे अभिप्राय शासनास कळविण्यास सांगितले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान घोषित करण्याबाबत

**(२०) १४५५५ (२७-०६-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हरभऱ्याच्या एकरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून नाफेडच्या (भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ) केंद्रावर हरभरा खरेदी दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास बंद केल्याने हजारो शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच यंदाही खरेदी न होऊ शकलेल्या हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १५०० रुपयाचे अनुदान घोषित करावे, अशी मागणी विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी दिनांक २७ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील हरबरा उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ सानुग्रह अनुदान घोषित करावे यादृष्टीने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) राज्यात हमीभावाने खरेदी दिनांक ०१/०३/२०२२ पासून सुरु झाली होती. तथापि, खरेदीसाठी दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता झाल्याने दिनांक २३/०५/२०२२ रोजी NeML पोर्टल बंद झाले होते.

(२) होय.

(३) राज्यात हमीभावाने खरेदीसाठी सुरुवातीस ६८.९२ लाख क्विंटलचे उद्दिष्ट निश्चित केले होते. हरभरा उत्पादनातील वाढ आणि शिल्लक शेतकऱ्यांची संख्या विचारात घेऊन खरेदीच्या उद्दिष्टात आणि खरेदी कालावधीत वाढ करण्यासाठी राज्यशासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्रशासनाने ७७,६४,६०० क्विंटल सुधारित उद्दिष्ट निश्चित करुन खरेदी कालावधी दिनांक १८/०६/२०२२ पर्यंत वाढविला होता. हमीभावाने खरेदी अंतर्गत ४,१२,७८८ शेतकऱ्यांकडून ७६.०३ लाख क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आली आहे. अतिरिक्त खरेदी कालावधीत शेतकऱ्यांकडून हरभरा खरेदी केलेला असल्याने अनुदान देण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.